दि. २७/०८/२०२६

# प्रेस नोट

## पवित्र प्रणालीमार्फत शिक्षण सेवक/शिक्षक पदभरती सन २०२५

## शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी-२०२५ नुसार प्राप्त जाहिरातीतील मुलाखतीशिवाय या प्रकारातील रिक्त पदांसाठी उमेदवारांच्या निवडीसाठी शिफारशीबाबत.

- महाराष्ट्र राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये पवित्र पोर्टल या संगणकीय प्रणालीद्वारे शिक्षण सेवक/शिक्षक पदभरतीसाठी "शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी-२०२५" चे ऑनलाईन पद्धतीने आयोजन करण्यात आले होते.

- सदर ऑनलाईन चाचणी दिनांक २७/०५/२०२५ ते ०५/०६/२०२५ या कालावधीमध्ये घेण्यात आली. या चाचणीसाठी एकूण **२,२८,८०८** उमेदवारांनी नोंदणी केली होती, त्यापैकी **२,११,३०८** उमेदवार चाचणीस प्रविष्ट झाले त्यातील उमेदवारांनी स्व प्रमाणपत्र पूर्ण केलेले **१,७०,१०८** आहेत.

- मुलाखतीशिवाय व मुलाखतीसह या दोन प्रकारातील पवित्र पोर्टलवर दिनांक ०१/०५/२०२६ ते २०/०८/२०२६ या दरम्यान जाहिराती प्राप्त झाल्या आहेत.
- त्यासाठी पात्र उमेदवारांकडून दिनांक ०६/०८/२०२६ ते १६/०८/२०२६ या कालावधीमध्ये प्राधान्यक्रम घेण्यात आलेले आहेत.
- पदभरतीसाठी उमेदवारांची प्राधान्यक्रमाची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर आता मुलाखतीशिवाय या प्रकारातील गुणवत्ता यादी आज सायंकाळी ७.०० वाजता प्रसिद्ध करण्यात येत आहे.

- **मुलाखतीशिवाय या प्रकारात व्यवस्थापननिहाय प्राप्त जाहिराती व शिफारस झालेल्या पदांचा तपशील :**

| अ क्र | व्यवस्थापन | मुलाखतीशिवाय पदसंख्या | शिफारस होत असलेली पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा परिषद | १३,२२५ | ८,४८१ |
| २ | नगर पालिका/परिषदा | २८० | २२६ |
| ३ | महागरपालिका | १,९५४ | १,३०६ |
| ४ | आदिवासी विकास विभाग शासकीय शाळा | २,४२१ | १,६०१ |
| ५ | शासकीय विद्यानिकेतन | ५६ | ५४ |
| ६ | खाजगी शैक्षणिक संस्था | १,८१८ | १,४५१ |
| | **एकूण** | **१९,७५४** | **१३,११९** |

- पदनिहाय निहाय रिक्त व शिफारस झालेल्या पदांचा तपशील :

| अ क्र | पद प्रकार | मुलाखतीशिवाय पदसंख्या | शिफारस होत असलेली पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | इयत्ता १ ली ते ५ वी | १२,६७१ | ७,५४१ |
| २ | इयत्ता ६ वी ते ८ वी | ५,४२१ | ४,२०७ |
| ३ | इयत्ता ९ वी ते १० वी | १,२९८ | १,११९ |
| ४ | इयत्ता ११ वी ते १२ वी | ३६४ | २५२ |
| | **एकूण** | **१९,७५४** | **१३,११९** |

- समांतर आरक्षणातील माजी सैनिक (१५ %) अंशकालीन (१०%) याप्रमाणे जाहिरातीत पदे मंजूर आहेत. त्याप्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध न झाल्याने २७६० पदे व १७६० पदे रिक्त राहिली आहेत, तसेच अनुसूचित जमाती प्रवर्गातील ८०२ व पेसा क्षेत्रातील अनुसूचित जमाती प्रवर्गाची १४०८ पदे रिक्त राहिली आहेत.

- सदर समांतर आरक्षणातील उमेदवार उपलब्ध न झाल्याने Converted Round घेऊन भरण्यात येणार आहेत.

- मुलाखतीशिवाय निवड प्रकारातील निवडीबाबत उमेदवारांना SMS द्वारेदेखील कळविण्यात येत आहे.

- उमेदवारांना https://tait२०२५.mahateacherrecruitment.org.in या संकेतस्थळावर भेट देऊन आपल्या निवडीची स्थिती पाहता येणार आहे.

- सध्या उमेदवारांच्या निवडीबाबतची स्थिती उमेदवारांच्या लॉगीनवर उपलब्ध करून देण्यात आली आहे. व्यवस्थापननिहाय सर्वसाधारण गुणवत्ता यादी लवकरच होम पेजवर Download या मेनूमध्ये देण्यात येईल.
- निवडीसाठी शिफारस झालेल्या उमेदवारांनी पुढील प्रक्रियेसाठी संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांचेशी संपर्क साधावा.
- पदभरतीबाबत उमेदवारांना याद्वारे आवाहन करण्यात येते की पवित्र पोर्टलवरील मुलाखतीशिवाय निवड प्रकारातील निवडीबाबत आपले म्हणणे/मागणी इ.बाबी साठी राज्यस्तरावर "तक्रार निवारण व दुरुस्ती समिती" स्थापन करण्यात आली आहे. edupavitra२०२५grcc@gmail.com या ईमेलवर दिनांक ०६/०९/२०२६ अखेर पर्यंत पाठवाव्यात, जेणेकरून त्याची योग्य ती दखल घेतली जाईल.
- निवडीसाठी शिफारस झालेल्या सर्व उमेदवारांचे शालेय शिक्षण विभागातर्फे हार्दिक अभिनंदन व पुढील शैक्षणिक कार्यास शुभेच्छा.

--****--